महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/२४३६९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : १२/१०/२०१८

# परिपत्रक

**विषय :** सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या गुणगौरव /सत्कार याबाबतच्या सुधारित तरतुदींबाबत स्पष्टीकरण.

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७३ दि. १८.०८.२०१८.

------------

महावितरण कंपनीच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी गुणगौरव / सत्कार करण्याकरीता प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७३ दि. १८.०८.२०१८ अन्वये सुधारीत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार गुणगौरव व बक्षिसाच्या रकमेमध्ये करण्यात आलेली वाढ राजीनामा दिलेले कर्मचारी, मृत कर्मचारी इत्यादींना अनुज्ञेय करण्याबाबत बहुतांशी क्षेत्रिय कार्यालयांमध्ये संदिग्धता आहे. यास्तव, सदर प्रकरणी एकरूपता राखण्याच्या दृष्टीकोनातून खालील बाबी स्पष्ट करण्यात येत आहेत.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७३ दि. १८.०८.२०१८ अन्वये सुधारीत करण्यात आलेल्या तरतुदींचा लाभ, शिस्तभंग कारवाई अंतर्गत ज्या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आलेली आहे अशा कर्मचाऱ्यांना वगळून इतर कोणत्याही प्रकारे ज्या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त झालेली आहे आणि उपदान अधिनियमांतर्गत उपदान मिळण्यास पात्र आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय राहील. तसेच जे कर्मचारी कंपनीच्या सेवेत असताना मृत पावतील अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधीत कर्मचारी मृत पावण्यापूर्वी कार्यरत होता अशा कार्यालयांकडून, संबंधीत कर्मचाऱ्याच्या पती/ पत्नी अथवा कुटुंबियांकडे एकूण रू. १०,०००/-(अक्षरी रू. दहा हजार फक्त) एवढी रक्कम, श्रध्दांजली / सांत्वनपर संदेशासह सुपूर्त करण्यात यावी.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके) १२/१०.
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)